दुरध्वनी क्र.२२८२१२३९
फॅक्स क्र.२२८२२३१२

Tel.No.२२८२१२३९
Fax No.२२८२२३१२

महाराष्ट्र शासन
मत्स्यव्यवसाय विभाग
तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००२
Government of Maharashtra
Department of Fisheries
Taraporevala Aquarium, Netaji Subhash Road, Mumbai ४०० ००२
Website: http// fisheries.maharashtra.gov.in
Email: commfishmaha@gmail.com

क्रमांक: मत्स्य/प्रशा/१४११०१/७५/२०२२ दिनांक: २६/०५/२०२२

## -: जाहिरात नमुना :-

**आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयात विधी अधिकारी-०१ पद आणि सहाय्यक विधी अधिकारी-०१ पद या पदांची सेवा मानधन तत्वावर कंत्राटी पद्धतीने घेण्याबाबत**

अर्ज आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयास सादर करण्याचा शेवटचा दिनांक: ०६/०६/२०२२

**अर्ज मागविणाऱ्या कार्यालयाचे नाव:** आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, तारापोरवाला मत्स्यालय, १ ला मजला, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई ४०० ००२

शासन निर्णय क्रमांक मत्स्यआ-२०२०/प्र.क्र.९६/पदुम-१२, दिनांक ०२/११/२०२१ अन्वये मंजूरी दिल्यानुसार, मत्स्यव्यवसाय विभागाशी संबंधित न्यायालयीन प्रकरणांमध्ये कायदा विषयक सल्ला घेण्यासाठी आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयात ११ महिन्याकरिता विधी अधिकारी -०१ पद आणि सहाय्यक विधी अधिकारी-०१ पद यांची सेवा कंत्राटी पद्धतीने घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर सेवा देणाऱ्या इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | पदाचे नाव व पदसंख्या | शैक्षणीक अर्हता | मानधन | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| १. | विधी अधिकारी - ०१ पद | LLM | ८०,०००/- पर्यंत (सर्व करांसह) | JOB RESPONSIBILITY: -<br>1. To assist and represent client in filing cases.<br>2. To advice clients on matters relating to legal issues.<br>3. To handle criminal and civil related litigations for clients.<br>4. Appearance before the Hon'ble Court. (Supreme court, High court and other courts also)<br>5. Appearance before the other Lower Tribunals including Revenue authorities on cases related to assist clients in legal matters.<br>6. Drafting, pleading, and sending notices, preparation of civil suits, applications, written statements, affidavits for other legal provisions under statutory provisions.<br>7. Assisting for acquisition land matters and also giving legal opinions for the issues related regarding property matters.<br>8. Acting as reality consultant and legal advisor in property matters.<br>9. To perform legal research in respect of dispute and litigations.<br>**A) Advisory**: Attending Conferences / Meetings consultations on various statutory aspects, providing legal opinions;<br>**B) Non-Litigation**: Drafting, vetting and settling various drafts, contracts, agreements, letters, notices etc.<br>**C) Litigation**: Drafting, vetting and settling various legal proceedings including Plaints, applications, affidavits, replies etc.<br>**Experience:**<br>Minimum 5 years experience |
| २. | सहाय्यक विधी अधिकारी - ०१ पद | LLB | ४०,०००/- पर्यंत (सर्व करांसह) | |

तरी, विधी विषयक सेवा देणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दिनांक ०६/०६/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९:४५ ते संध्याकाळी ६:१५ पर्यंत) आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयास पोहोचतील अशा दृष्टीने पाठवावेत.

(डॉ.अतुल पाटणे भाप्रसे)
आयुक्त मत्स्यव्यवसाय,
महाराष्ट्र राज्य मुंबई

अटी व शर्ती-

१) आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती सदस्य मुलाखत घेऊन उमेदवारांची निवड करतील.

२) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त ११ महिन्यांसाठी असेल. सहा महिन्यांनी कामाचा आढावा घेऊनच पुढील मुदतवाढ देण्यात येईल.

३) उमेदवारास विभागास वरीलप्रमाणे सेवा तपशिलामध्ये नमूद प्रमाणे सेवा उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसे बंधपत्र/ हमिपत्र सादर करणे अनिवार्य असेल.

४) करार पध्दतीवरील नेमलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/ माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक असेल.

५) करार पध्दतीवरील नेमलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना नियमित कर्मचाऱ्याप्रमाणे नियम अटी व शर्ती लागु राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगिक लाभ अनुज्ञेय / लागु राहणार नाहीत. त्यांच्या सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधनाबाबत हे कार्यालयीन प्रशासन व शासन जबाबदार राहणार नाही.

६) करार पध्दतीवरील नेमलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे सेवेचे कोणतेही उत्तर दायीत्व शासनावर किंवा या कार्यालयावर राहणार नाही.

७) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे नियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर संबंधित कंत्राटी उमेदवारास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशणाबाबत/ सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

८) वरील कामाकरीता नेमलेले उमेदवार हे उपरोक्त कामासाठी ते शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असणे आवश्यक आहे.

९) करार पध्दतीवरील नेमलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी सुचविलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे संबंधितांस बंधनकारक राहील

१०) सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायीक कामात संबंधित कंत्राटी अधिकारी/ कर्मचारी गुंतलेला नसावा.

११) नियुक्ती प्राधिकारी तथा आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी आपली करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार अबाधित राहतील.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:**

मा.प्रधान सचिव, (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (स्वीय सहाय्यक कक्षामार्फत)